


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २२९, मंगळवार २८ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर पब्लिकचे सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण!

■ विद्यालयाचा शंभर टक्के निकाल ■ श्रुती कडूस पहिली ■ ५९ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर पब्लिक स्कुलने दहावीच्या परीक्षेत आपल्या नावलौकीकास साजेसे यश प्राप्त केले असून परीक्षेस बसलेले सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाची श्रुती कडूस ही विद्यार्थीनी ९८.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली. या विद्यालयातील ९९ पैकी ५९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून विद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधोरेखीत केला.**

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विषय शिक्षक दत्तात्रय काकडे, दिपक जाधव, अण्णासाहेब महानोर, प्रशांत साळवे, सतीश काकडे, सविता कानवडे, नलिनी गायकवाड, योगिता राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पद्मभुषण अण्णासाहेब हजारे, ज्ञानेश डांगे, संस्थेचे संस्थापक गिताराम म्हस्के, संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



## १०० पैकी १०० !

श्रुती कडूस, हिने गणित व संस्कृतमध्ये १०० पैकी १००, अक्षदा शिंदे,श्रेया वैद्य, निशा जरे, समृध्दी तांबे, साईराज पठारे, श्रावणी सोनवणे यांनी संस्कृतमध्ये १०० पैकी १०० तर श्रावणी गोडसे हिने गणितात १०० पैकी १०० गुण मिळविले. ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले २२ विद्यार्थी असून ५९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले.

## ९५ टक्क्याहून अधिक गुण प्राप्त करणारे विद्यार्थी

श्रुती कडूस ९८.८०,अक्षदा शिंदे ९८.६०, श्रावणी गोडसे ९८.४०, श्रेया वैद्य ९८.४०, श्रावणी सोनवणे ९७.८०, आदीत्य मासाळकर ९७.४०, अनिकेत जाधव ९७.४०,साईराज पठारे ९७, पायल बेलोटे ९६.६०, साई पठारे ९६.६०, यामीनी ब्रम्हे ९६.४०, यश रेपाळे ९६.४०, पद्मश्री पठारे ९६.२०, तनिष्का थोरात ९६.२०, प्रज्ञा दिवटे ९६ , वेदांत जगदाळे ९६, हर्षद डमरे ९५.८०, राज पठारे ९५.८०, ऐश्वर्या जाधव ९५.६०, इंद्रनिल औटी ९५.४०, नीशा जरे ९५.२०

## ९० ते ९४ टक्के

हर्ष व्यवहारे ९४.६०, संस्कृती ठुबे ९४.६०,चैतन्य औटी ९४.४०, दर्शन बोरा९४.४०, युवराज औटी ९४.४०,प्रणव निघुट ९४.४०, सागर औटी ९४.२०, श्रध्दा औटी ९४.२०,सुजित औटी ९४, सोमनाथ सोबले ९४, साक्षी गवळी ९४, सार्थक औटी ९३.८०, आदीत्य गायकवाड ९३.८०, शिवम गवळी ९३.८०, जयेश सोबले ९३.४०, प्रज्वल औटी ९३.२०, वेदीका शेटवड ९३.२०, आर्यन पवार ९३.२०, अथर्व थोरात ९३.२०, आकाश हारदे ९३, साक्षी काळे ९२.२०, श्वेता उगले ९२, कौस्तुभ मुळे ९१.८०,सौरभ बुरोगोणी ९१. ६०, इरफान शेख ९१.४०, आदीत्य कळमकर ९१.२०,वेदांत ठुबे ९१.२०, अभय चिरके ९१, पुष्कार माधवाई ९०.६०, समर्थ औटी ९०.४०, तन्मय कांडेकर ९०.४०, आदीत्य दिवटे ९०.२०, साहिल बोरूडे ९०.२०, अजिंक्य दिवेकर ९०, तेजस चौधरी ९०,दिशा गोळे ९०.

## ८९ ते ८५ टक्के

सार्थक थोरात ८९.२०, संकेत रासकर ८९, अविष्कार ठुबे ८८.८०, अनन्या पानसरे ८८.६०, सार्थक कोल्हे ८८, तन्मय गाडेकर ८७.८०, स्नेहल खोडदे ८७.६०, निशांत मुंगसे ८७.६०, ओम वेताळ ८७.२०, कुशल नरोडे ८६.६०, कौस्तुभ रावडे ८६.२०, सुमित पवार ८६.२०, समृध्दी वाघमारे ८५.८०, अनिकेत अडसूळ ८५.२०.

## ८४ टक्के ते ६३ टक्के

तेजस गायकवाड ८४.८०, क्षितीज भोर८४.६०, हर्षल आवारी ८४.२०, वैष्णवी ठुबे ८४.२०, युवराज औटी ८४, प्रमय मगर ८४, शंकर गुंड ८३.८०, सुजल जरे ८२.४०, तेजस भुतारे ८३.२०, वैभव निमसे ८३.२०, कुणाल गाडे ८२.६०, देवराज कुमावत ८२.२०, कुणाल पवार ८१.४०, सार्थक बागल ८०.७०, संकेत कोल्हे .८०.६०, प्रवण शेरकर ८०, पायल शिंदे ७९.४०, जिशान तांबोळी ७९.२०, कुणाल बागल ७८.२०, समर्थ नांदे ७८.२०, वैष्णवी जाधव ७६.६०, तन्वी गुंड ७५.२०, ओम पोटघन ७४,ओम नांगरे ७०.४०, सादीया खान ७०.४०, इम्रान शेख ६८.६०. श्रेया नरसाळे ६३.६०.

# नीलेश लंकेंनी जम्मूमध्येही जपली सामाजिक बांधिलकी !

चक्कर येऊन पडलेल्या वैष्णोदेवी भक्तावर रूग्णालयात नेऊन उपचार

पारनेर : प्रतिनिधी

**माणूस कोणताही, कुठलाही असो त्याच्या मदतीला धावून जाण्याचा पिंड असलेल्या मा. आ. नीलेश लंके यांची सामाजिक बांधिकली जम्मूमध्येही पहावयास मिळाली.**

लोकसभा निवडणूकीनंतर मा. आ. नीलेश लंके हे वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी गेले असून रविवारी देवीचे दर्शन घेऊन परतत असताना देवीच्या दर्शनास निघालेले औरंगाबाद येथील देवी भक्त नवनाथ नाथा कोळसे चक्कर येऊन कोसळले. त्याच वेळी नीलेश लंके व त्यांचे सहकारी तिथे पोहचले. लंके यांनी पुढाकार घेत तात्काळ रूग्णवाहिकेची सोय करून चार किलोमीटर अंतरावरील रूग्णालयात त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढे कटारा येथील रूग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले.

रूग्णालयातील डॉक्टरांशी कोळसे यांना कशामुळे चक्कर आली असावी ? त्यांच्यावरील उपचारानंतर त्यांची प्रकृती कधी सुधारेल ? आदींबाबत चर्चा केली. कोळसे यांच्या नातलगांशी संपर्क करून झालेल्या घटनेची माहितीही लंके यांनी दिली. कोळसे यांच्यावर उपचार सुरू केल्यानंतर ते उपचारास प्रतिसाद देऊ लागल्यानंतर लंके हे पुढील प्रवासासाठी निघाले. लंके यांच्या समवेत अनिल गंधाक्ते, कांतीलाल भोसले, सचिन गवारे, सचिन कराळे हे नीलेश लंके प्रतिष्ठानचे सदस्य होते.

लंके हे नेहमीच वैष्णादेवीच्या दर्शनासाठी कटारा येथे जातात. त्यामुळे त्यांची या भागातील हॉटेल व्यवसायीक तसेच स्थानिक नागरीकांशी थेट ओळख आहे. लंके कटारा येथे पोहचल्यानंतर आमच्याच हॉटेलमध्ये थांबा असा हॉटेलचालकांचा आग्रह असतो. लंके हे सर्वांना संधी देत प्रत्येक वेळी वेगवेगळया हॉटेलमध्ये थांबतात. लंके यांच्या तेथील संपर्कामुळेच कोळसे हे चक्कर येउन पडल्यानंतर तातडीने रूग्णवाहीका घटनास्थळी पोहचण्यास मदत झाली.



■ वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन कटाऱ्याकडे परतत असताना चक्कर येउन पडलेल्या औरंगाबाद येथील भाविकास नीलेश लंके यांनी रूग्णवाहिची सोय करून रूग्णालयात उपचार सुरू केले.

## कोळसेंच्या नातलगांकडून कृतज्ञता

कोळसे हे चक्कर येऊन पडल्यानंतर नीलेश लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने रूग्णवाहिका उपलब्ध करून त्यांच्यावर कमी कमी वेळेत उपचार सुरू केले. लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखविलेल्या तत्परतेविषयी कोळसे यांच्यासह त्यांच्या नातलगांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## हे माझे कर्तव्यच

एखादी व्यक्ती संकटात असेल तर मइ-या मनालाही त्याच्या वेदना होतात. त्यामुळे मी कुठेही असलो तरी संकटात असलेल्या व्यक्तीच्या मदतीला धावून जातो. संकटात सापडलेल्या, आडलेल्या व्यक्तींना मदत करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामुळेच कोठेही जा माझा दांडगा लोकसंपर्क निर्माण झाला आहे व तीच माझी संपत्ती आहे.

नीलेश लंके
मा. आमदार

# पारनेर तालुका दहावीच्या निकालात अव्वल

जिल्ह्यातील ३४२ शाळांचा शंभर टक्के निकाल

नगर : प्रतिनिधी



**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी परीक्षेचा निकाल आज जाहीर केला आहे. जिल्ह्याचा दहावीचा यंदाचा एकूण निकाल ९५.२७ टक्के इतका लागला आहे. यंदाच्या निकालामध्ये पारनेर, जामखेड, श्रीगोंदा आणि अकोले तालुक्यांनी बाजी मारली आहे. श्रीरामपूर ९२.५२ टक्क्यांसह जिल्ह्यात तालुकानिहाय टक्केवारीनुसार सर्वात खाली आहे. तर निकालांमध्ये पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारली आहे.मुलींचा निकाल ९७.०१ टक्के तर मुलांचा निकाल ९३.८५ टक्के लागला आहे. आकडेवारीनुसार, सर्वच तालुक्यांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे.**

जिल्ह्यातून मार्च २०२४ च्या परीक्षेसाठी ६७ हजार ९७० विद्यार्थी बसले होते. यामध्ये ३७ हजार ३९३ मुले तर ३० हजार ५७७ मुली होत्या. यापैकी ६४ हजार ७६१ विद्यार्थी पास झाले आहेत. यामध्ये ३५ हजार ९७ मुले तर २९ हजार ६६४ मुली आहेत.

**३४२ शाळांचा शंभर टक्के निकाल-**

जिल्ह्यात ३४२ शाळांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. यामध्ये नगर - ४८, अकोले - ४६, संगमनेर- ४१, पारनेर - ३५, श्रीगोंदा - २५, पाथर्डी - २६, नेवासा - २२, राहुरी - १७, श्रीरामपूर -१७, राहाता- १६, कोपरगाव- १६, कर्जत - १६, शेवगाव- १०, जामखेड - ७

**गतवर्षी पेक्षा टक्केवारी वाढली-**

गतवर्षी जिल्ह्याचा निकाल ९४.४८ टक्के लागला होता. यामध्ये देखील मुलींनीच बाजी मारली होती. मुलांचा निकाल ९२.७९ तर मुलींचा निकाल ९६.६२ टक्के लागला होता. मागील वर्षी श्रीगोंदा तालुक्याचा सर्वाधिक निकाल लागला होता. तर जिल्ह्यात २७६ शाळांचा निकाल शंभर टक्के लागला होता.

**तालुकानिहाय निकाल-**

**तालुका - निकाल**

पारनेर - ९६.५३ जामखेड - ९६.५० श्रीगोंदा - ९६.४२ अकोले - ९६.३६ कर्जत - ९५.९९ कोपरगाव - ९४.३३ नगर - ९५.३३ नेवासा - ९५.७३ पाथर्डी - ९५.७३ राहाता - ९४.४३ राहुरी - ९३.२३ संगमनेर - ९५.६० शेवगाव - ९५.८९ श्रीरामपूर - ९२.५२

# दहावीच्या परीक्षेत मुलींनीच मारली बाजी

■ राज्यात दहावीचा ९५.८१% निकाल ■ १५ लाख १७ हजार ८०२ विद्यार्थी उत्तीर्ण ■ कोकण विभाग आघाडीवर

मुंबई : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. राज्यात दहावीचा ९५.८१ % निकाल लागला आहे. यंदाही मुलींनीच दहावीच्या निकालात बाजी मारली आहे. यंदा १५ लाख १७ हजार ८०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदाही कोकण विभाग आघाडीवर आहे. गतवर्षी हा निकाल ९३.८३ % होता यंदा त्यात १.७८% टक्के वाढ झाली आहे.**

**नागपूर विभागाचा सर्वात कमी निकाल**

यंदा कोकण विभागाचा निकाल सर्वात जास्त लागला आहे. तर नागपूर विभागाचा सर्वात कमी निकाल लागला आहे. तसेच यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. मुलींची उत्तीर्ण टक्केवारी ९७.२१ टक्के आहे. तर ९४.५६ टक्के ही मुलांची उत्तीर्ण टक्केवारी आहे. याशिवाय १६ लाख २१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यापैकी १५ लाख १७ हजार ८०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

**दिव्यांग विद्यार्थ्यांचा निकाल ९३.२५ %**

तसेच ९०७८ दिव्यांग विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी ८४६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांचा निकाल ९३.२५ टक्के लागला आहे. कोकण विभागाचा निकाल ९९.०० % तर नागपूर विभागाचा ९४ % असा सर्वात कमी निकाल लागला आहे. विशेष म्हणजे ७२ पैकी १८ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

**१८७ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण**

राज्यातील नऊ विभागांमधून तब्बल १८७ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले आहेत. यापैकी सर्वाधीक १०० टक्के प्राप्त केलेले विद्यार्थी लातूरमधील आहेत. लातूर विभागात तब्बल १२३ विद्यार्थ्यांना १०० टक्के प्राप्त झाले आहेत. तर दहावीच्या निकालात १ लाख ८४ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी अतिरिक्त गुण मिळवले आहेत.

**विभागनिहाय निकाल**

पुणे -९६.४४ %
नागपुर -९४.७३%
छत्रपती संभाजीनगर -९५.१९ %
मुंबई - ९५.८३ %
कोल्हापूर - ९७.४५%

# विजयाचा उन्माद नको आणि पराभवाने खचू नका !

■ अजित पवारांचा पदाधिकाऱ्यांना सल्ला ■ विधानसभेला जागावाटपात जास्त जागा मिळण्याचा विश्वास

मुंबई : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मनापासून काम केले आहे. त्या सर्वांचे आभार मानत अजित पवार यांनी विजयाचा विश्वास व्यक्त केला.**

लोकसभा निवडणुकीत विजय मिळवला तरी त्यांचा उन्माद होऊ द्यायचा नाही. पराभव झाला तरी कोणीही खचून जायचे नाही. हे राजकारणात सर्वांनी लक्षात ठेवावे, असे आवाहन अजित पवार यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या



प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक मुंबईत पार पडली, या वेळी ते बोलत होते.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत आपल्या पक्षाच्या सात उर्वरीत पान ३ वर






# शिवार

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# फुलझाडांच्या लागवडीचा हंगाम

**खरीप हंगामात पाऊस भरपूर पडत असल्याने हा हंगाम फुलझाडांच्या लागवडीसाठी उत्तम असतो. मात्र या पिकांच्या लागवडीसाठी चांगला निचरा असलेली व भरपूर सेंद्रिय पदार्थयुक्त जमिनीची निवड करावी. व्यापारी उत्पादनासाठी तसेच शोभेसाठी म्हणून या पिकांची लागवड करताना सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा.**

खरीप हंगामात झेंडू, गॅलार्डिया, अ‍ॅस्टर, शेवंती, चांदणी, झिनिया, कॉसमॉस, सूर्यफूल, टिथोनिया, बाल्सम, सिलोसिया, गॉन्फ्रेना, सालव्हिया, हॉलीहॉक, कॉक्स कोंब इत्यादी फुलझाडांच्या लागवडीसाठी अनुकूल काळ असतो. यापैकी झेंडू, अ‍ॅस्टर, गॅलार्डिया, चांदणी, डेझी इत्यादी फुलझाडांची व्यापारी तत्त्वावर लागवड केली जाते. इतर फुलांची बागांमध्ये ताटवे करून लागवड केली जाते. सुट्या फुलांसाठी अ‍ॅस्टर, झेंडू, गॅलार्डियाची लागवड केली जाते. कट फ्लॉवरसाठी अ‍ॅस्टर, कॉक्स कोंब, अमरॅन्थस ही फुलझाडे लावतात तर फिलरसाठी सोनतुरा हे पीक लावतात.



## हवामान अन् जमीन...

खरीप हंगामी फुलझाडांना उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. चांगल्या वाढीसाठी दिवसाचे २५-३० अंश सेल्सिअस व रात्रीचे १५-२० सेल्सिअस तापमान लागते. सरासरी १५-२५ सेल्सिअस तापमानात चांगली वाढ होते. हवेतील चांगला दमटपणा व ६० ते ७० टक्के आर्द्रता या पिकांना मानवते. उत्तम वाढीसाठी चांगल्या निचऱ्याची मध्यम जमीन (सामू ६.५) निवडावी. जमीन सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असावी. कुंडीमध्ये लागवडीसाठी एक भाग शेणखत अधिक एक भाग पोयट्याची माती असे १:१ प्रमाणाचे मिश्रण तयार करून केलेले माध्यम वापरावे.

## पूर्वमशागत करताना...

एकदा खोल नांगरट व दोनवेळा कोळपणी करून जमीन भुसभुशीत करून घ्यावी. शेवटची कोळपणी करताना हेक्टरी ३० टन शेणखत मातीत चांगले मिसळावे. पुर्वमशागतीनंतर सपाट वाफे किंवा सरी वरंबे तयार करावेत. कुंडीतील लागवडीसाठी कुंडीच्या तळाशी वाळलेला पालापाचोळा टाकून माती मिश्रणात १००-१५० ग्रॅम १५:१५:१५ हे खत मिसळून कुंड्या भराव्यात. कुंड्या भरताना वरुन एक ते दीड इंच मोकळ्या राहतील याची काळजी घ्यावी.

## खते व पाणी व्यवस्थापन

लागवडीवेळी प्रतिहेक्टरी १०० किलो नत्र, २०० किलो स्फुरद, २०० किलो पालाश द्यावे. लागवडीनंतर एक दे दीड महिन्याच्या अंतराने उरलेली नत्राची मात्रा १०० किलो प्रतिहेक्टरी याप्रमाणात द्यावी. दर्जेदार व भरपूर उत्पादनासाठी पीक बहरात असताना २ टक्के (२० ग्रॅम प्रतिलिटर) युरियाची फवारणी करावी. निंदणी करताना रोपांना मातीची भर द्यावी. पिकांना पाऊस नसेल तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. जादा पाऊस झाल्यास पाण्याचा योग्य निचरा होईल याची काळजी घ्यावी.

## अभिवृद्धी व लागवड पद्धत

खरीप लागवड ही बियापासून केली जाते. बहुतांश पिकांच्या बिया लहान असल्यामुळे रोपे तयार करावीत. रोपे गादीवाफा किंवा लाकडी ट्रे किंवा कुंड्यांमध्ये तयार करावीत. पावसाळ्याच्या सुरवातीला वाफ्यावर बियांची पेरणी करावी. बी पेरणीपूर्वी बियाणास कॅप्टन २ ग्रॅम प्रतिलिटर चोळावे. बी जमिनीत अर्धा ते एक सें.मी. खोल पेरावे. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर १० सें.मी. ठेवावे. पेरणीनंतर बी बारीक माती व शेणखत यांच्या मिश्रणाने झाकावे व ताबडतोब पाणी द्यावे. उगवणीनंतर पाणी देणे, तण काढणे इत्यादी कामे वेळेत करावीत. रोपांची पुनर्लागवड ४-५ पाने आल्यावर किंवा रोपांची उंची १०-१५ सें.मी. झाल्यावर करावी. वाफ्यावरून रोपे उपटण्यापूर्वी रोपांना हलके पाणी द्यावे. म्हणजे रोपे उपटताना मुळांना इजा होणार नाही. ढगाळ हवामानात रोपांची पुनर्लागवड करावी. रोप लागवडीनंतर पाणी द्यावे. झेंडू, अ‍ॅस्टर, चांदणी, झिनिया, कॉसमॉस, गॅलार्डिया, सालव्हिया, टिथोनिया या फुलझाडांची रोपे तयार करून लागवड करतात. शेवंती, झेंडू लागवड कोवळ्या छाट्यापासून रोपे तयार करून करतात. शेवंती व डेझीची लागवड फुटव्यापासूनही करता येते. सूर्यफूल, हॉलीहोक आदी फूलझाडांच्या बिया असतात. त्यामुळे त्यांची लागवड सरळ बी फेकून केली जाते. निशिगंधाची लागवड कंद लावून करतात. टीप : कंपनीकडूनच बियाणे प्रक्रिया केली असल्यास पुन्हा वेगळी करू नये.

### लागवडीचे अंतर व वेळ

फुलझाडांची वाढ व जमिनीच्या मगदुरानुसार लागवड ३०x३०, ३०x४५ अथवा ४५x४५ सें. मी. अंतरावर करावी. लागवड जून-जुलै महिन्यात करावी.



## संत्रावर्गीय फळ

# काळजीपूर्वक तोडणी अन् हाताळणी!

**संत्रावर्गीय फळांचा आकर्षक रंग, स्वाद, चव टिकून राहणे महत्त्वाचे असते. यासाठी फळांची काळजीपूर्वक तोडणी आणि हाताळणी फार महत्त्वाची असते. लिंबूवर्गीय फळांना चांगले दर मिळण्यासाठी काढणीपश्चात तंत्रज्ञानाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. ग्राहकांपर्यंत फळे पोहोचेपर्यंत २० ते २५ टक्के फळे खराब होतात. अयोग्य हाताळणी, पॅकिंग व वाहतूक, साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा व तोडणीनंतरच्या प्रक्रियेचा अभाव या कारणांमुळे फळे खराब होतात. संत्रा फळांची प्रत प्रामुख्याने लागवडीचे नियोजन, बागेच्या मशागतीच्या पद्धती, पीक व्यवस्थापन, काढणी आणि काढणीपश्चात व्यवस्थापनावर अवलंबून असते.**

फळांची तोडणी सकाळ किंवा संध्याकाळच्या वेळी करावी. दमट हवामानात व पावसाळ्यात फळे तोडू नयेत. तोडलेली फळे उन्हामध्ये ठेवू नयेत. तोडणी अर्धा ते पाऊण भागावर पिवळसर नारिंगी रंगाची छटा आल्यावर करावी. फळांच्या रसामध्ये किमान १० टक्के एकूण विद्राव्य घटक (TSS) आणि एकूण विद्राव्य आम्लाचे प्रमाण १४ पेक्षा जास्त असलेली संत्रा फळे स्वादिष्ट आणि दर्जेदार असतात. लिबलिबीत फळे वाहतुकीसाठी योग्य नसतात. घट्ट, गुळगुळीत फळे वाहतुकीस व साठवणुकीस योग्य असतात. योग्य परिपक्वता व आकर्षक रंगासाठी निवडक संत्री ३ ते ४ वेळा तोडणी करून काढावीत. मोसंबी फळांमध्ये १० टक्के शर्करायुक्त पदार्थ व ४०-४५ टक्के रस असणे आवश्यक असते. कागदी लिंबात किमान ५० टक्के रस असणे आवश्यक आहे.



## पॅकिंगहाऊसमधील नियोजन

- अहरितीकरण : फळाचे हरित रंगद्रव्य (क्लोरोफिल) कमी करून आकर्षक नारिंगी रंग विकसित करण्यासाठी अहरितीकरण केले जाते. ही प्रक्रिया अत्यावश्यक असेल तरच करावी. चांगल्या रंगाच्या फळांची तोडणी केल्यास अहरितीकरणाची आवश्यकता नसते. अहरितीकरणामुळे फळे जास्त काळ टिकून राहतात. यासाठी जास्त आर्द्रता (९० ते ९५ टक्के), योग्य तापमान (२५-२७ अंश सेल्सिअस) आणि इथिलीन वायूची योग्य मात्रा (५ ते १० पीपीएम) असणे आवश्यक आहे. अहरितीकरण ४८ तासांपेक्षा जास्त वेळ करू नये. फळे तोडणीपूर्वी १५ दिवसांच्या अंतराने कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अहरितीकरण करण्यापूर्वी २ ग्रॅम कार्बेन्डाझीम प्रतिलिटर पाण्यात मिसळून त्यात फळे बुडवून घ्यावीत. यामुळे साठवणुकीदरम्यान देठाच्या बाजूने होणारी कूज कमी होते. फळे शीतगृहामध्ये १ ते २ महिने साठवून नंतर विक्री करायची असल्यास, अहरितीकरणाची आवश्यकता नसते. शीतगृहातील साठवणुकीदरम्यान फळांना नैसर्गिक नारिंगी रंग येतो.
- स्वच्छता : प्रतवारी यंत्राच्या पट्ट्यावरून जाणारी ओबडधोबड आकाराची, मोठ्या देठाची, अपरिपक्व, अतिपरिपक्व, पोला, खरचटलेली, हिरव्या रंगाची, कीड, रोगग्रस्त आणि जास्त लहान, मोठी फळे काढून टाकावीत. फळे स्वच्छ धुऊन घ्यावीत. फळे स्वच्छ करणाऱ्या यंत्राचे ब्रश क्लोरिनने (१०००पीपीएम) ओले करावेत. फळांवर मेणाची प्रक्रिया करण्यापूर्वी फळांवरील पाणी स्पाँज रोलरने काढावे.
- मेणाची प्रक्रिया : फळे पूर्णपणे कोरडी झाल्यानंतर १ ग्रॅम कार्बेन्डाझिम प्रति लिटर मेणाच्या द्रावणात स्टेफ्रेश हायशाईन वॅक्स २.५ टक्क्यांची फळांवर प्रक्रिया करावी. मेणाची प्रक्रिया करण्यापूर्वी वॅक्सिंग यंत्राचे सर्व ब्रश बुरशीनाशक युक्त मेणाच्या द्रावणाने ओले करावेत. या प्रक्रियेवेळी यंत्राची गती योग्य ठेवावी. त्यामुळे फळांवरील अनावश्यक ब्रशिंग टाळले जाईल. टनेल ड्रायर यंत्रामध्ये फळांवरील मेण ५०-५५ अंश सेल्सिअस तापमानावर सुकवावे.
- प्रतवारी : फळांची आकारानुसार यंत्रावर प्रतवारी करावी. साधारणतः संत्र्याचा व्यास ५.५० ते ८.५० सेंमी असतो. बॉक्समध्ये पॅक केलेल्या फळांच्या व्यासात ०.६० ते ०.७५ सेंमी पेक्षा जास्त फरक ठेऊ नये. अन्यथा पेटीमध्ये फळांचे योग्य पॅकिंग होत नाही. फळांची प्रतवारी लहान (५.५० ते ६.१० सेंमी), मध्यम (६.११ ते ६.७० सेंमी), मोठी (६.७१ ते ७.३० सेंमी) व खूप मोठी (७.३१ ते ८.०० सेंमी) अशी करावी. वाहतूक व हाताळणी दरम्यान पेटीतील फळे हलण्याची शक्यता असते. यासाठी प्रतवारी केलेल्या फळांची हाताने पॅकिंग करावी. फळांच्या थरांमध्ये कोरूगेटेड बोर्डला (५ प्लाय) छिद्र करावे.

### पॅकिंग बॉक्स

रेग्यूलर, युनिव्हर्सल किंवा टेलिस्कोपिक पद्धतीच्या हवेशीर कोरूगेटेड बोर्डच्या बॉक्सचा वापर करावा. बॉक्सची कॉम्प्रेशन क्षमता ३६० ते ४०० किलो असावी. तीन किंवा ५ प्लायच्या कोरूगेटेड प्लेटचा वापर कुशन म्हणून करावा. फळातील दोन थरांमध्ये, पेटीच्या तळाला व सर्वात वर कुशन टाकावे. कोरूगेटेड बोर्डाच्या पेटीमध्ये तणसचा वापर टाळावा. शीतगृहामध्ये साठवण करण्यासाठी पॉलीप्रोपोलीन प्लास्टिक लॅमिनेशन केलेल्या पेट्या वापराव्यात. पेटीमध्ये हवा खेळती राहण्यासाठी दोन्ही बाजूला छिद्र करावेत. तसेच पेटी उचलण्यासाठी दोन्ही बाजूंनी लांब आकाराचे छिद्र करावेत. देशांतर्गत बाजारासाठी ५० सेंमी लांब, ३० सेंमी रुंद, आणि ३० सेंमी उंच पेट्या निवडाव्यात. निर्यातीसाठी वेगळ्या प्रकारच्या बॉक्सची आवश्यकता असते. निर्यातीसाठी ७ ते १० किलोचे बॉक्स वापरले जातात. बॉक्सवर फळांचे वाण, वजन, संख्या, पत्ता आदी माहिती असणे आवश्यक आहे.

## तोडणीवेळी घ्यावयाची काळजी

पारंपरिक पद्धतीत फळे पीळ देऊन व ओढून तोडली जातात. फळांच्या देठाला इजा आणि छिद्र पडू न देता तोडणी करणे आवश्यक असते. फळे तोडण्यासाठी फळे तोडण्याच्या कात्रीचा वापर करावा. मात्र, देठ लहान ठेवून तोडणी करावी लागत असल्यामुळे तोडणीचा वेग कमी होतो. ज्या फळांची पारंपरिक पद्धतीने तोडणी नसेल त्यांची कात्रीने तोडणी करावी. तोडणीदरम्यान फळांच्या देठाला व गोल तोटीस (कॉलर) इजा झाल्यास, त्याजागी ३ ते ४ दिवसांनंतर काळ्या, गर्द भुऱ्या रंगाचा डाग दिसू लागतो. यामुळे फळांचा दर्जा कमी होऊन बाजारात योग्य किंमत मिळत नाही. फळे विक्रीला पाठवताना चांगली व खराब, खाली पडलेली फळे एकत्र मिसळू नयेत. तोटी असलेली व खाली पडलेली फळे काढून टाकावीत.

## पॅकिंग हाऊसपर्यंत वाहतूक

तोडणीनंतर बागेतच तणसावर फळांची प्रतवारी करणे टाळावे. तोडलेली फळे पिशवीतून प्लास्टिकच्या क्रेटमध्ये एकत्र करावीत. प्लास्टिकचे क्रेट्स सावलीत ठेवावेत. फळे परंपरागत पद्धतीप्रमाणे सुकवण्यास ठेवल्यामुळे निस्तेज होतात. अशा फळांना योग्य बाजारभाव मिळत नाही.



वाहतुकीदरम्यान प्लास्टिकच्या क्रेटखाली तणसाचा थर द्यावा. वाहनाला ताडपत्रीने झाकावे. वाहनामध्ये हवा खेळती राहून तापमान कमी करण्यास चहुबाजूंनी जागा ठेवावी. फळांचा ताजेपणा टिकवण्यासाठी, तोडणीनंतर त्वरित प्रक्रिया व पॅकिंग करणे आवश्यक आहे.



- पॉलीइथिलिन (प्लास्टिक) चे आवरण : फळांचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी २५ ते ५० मायक्रोमीटर (१०० ते १२० गेज) जाडीच्या प्लास्टिक बॅगचे आतील बाजूला आवरण द्यावे. त्यावर फळे व्यवस्थित रचून पॅकिंग करावे. प्लास्टिक बॅगच्या १.५ टक्के भागावर हवेसाठी अर्धा सेंमी व्यासाचे लहान छिद्र ठेवावे. हे छिद्र मार्च- एप्रिलच्या शुष्क पण उष्ण हवामानात आवश्यक असते.
- शीतगृहात साठवण : निर्यातीदरम्यान किंवा शीतगृहात साठवण करण्यासाठी फळांच्या पेट्यांचे फोर्स एअर कुलिंग तंत्रज्ञानाने ६ ते ७ अंश सेल्सिअस तापमानावर शीतकरण करावे. शीतगृहात ६-७ अंश सेल्सिअस तापमान व ९०-९५ टक्के आर्द्रता असल्यास फळे ४५ ते ५० दिवसांपर्यंत चांगली ताजी राहतात. तोडणीनंतर ३-४ दिवसांत पॅकिंग, वाहतूक व विपणन करायचे असल्यास, शीतकरणाची आवश्यकता लागत नाही. शीतगृहातून संत्री काढल्यावर फळ सडण्याने होणारे नुकसान टाळण्यासाठी हाताळणी व विपणन करावे.

# रोपवाटिका व्यवसाय!

**कोणत्याही पिकाचे किमान दीड ते दोन महिने आधी नियोजन केले असल्यास स्वतःच स्वतःची रोपे तयार करता येतात. मात्र, अनेक शेतकरी असे नियोजन करत नसल्यामुळे बाहेरून रोपे खरेदी करावी लागतात. ही बाजारपेठ गृहीत धरून काही शेतकऱ्यांना रोपवाटिका व्यवसाय करणे शक्य आहे. त्यातून चांगले अर्थार्जन होऊ शकते.**

रोपवाटिका किंवा कोणत्याही झाडाची अभिवृद्धी हे शास्त्र आणि कला यांचा संगम असतो. शेतकरी चांगल्या बियांचा सतत शोध घेऊन त्याद्वारे पीक घेत असतो. काही पिकांची पेरणी केली जाते, तर काही पिके हे रोपे तयार करून त्यांची पुनर्लागवड केली जाते. त्यात फळझाडे, वनशेतीतील काही दीर्घायू झाडे यांच्या निर्मितीचे तंत्र वेगवेगळे असते. या तंत्राचा काळजीपूर्वक वापर करावा लागतो. कारण बियांपासून अभिवृद्धी करताना मूळ झाडातील गुणधर्म जसेच्या तसे येतीलच, याची खात्री राहत नाही. त्यामुळे बियांपासून वाढवलेली झाडे एकसारखी वाढत नाहीत, त्यांच्या फळांच्या गुणवत्तेतही फरक जाणवतात. हे टाळण्यासाठी कलम करण्याच्या विविध पद्धती अगदी प्राचीन काळापासून वापरल्या जातात. उदा. चीनमध्ये लिची झाडावर गुटी कलम, तर भारतात कंदमुळापासून अभिवृद्धीचे तंत्र प्राचीन काळापासून अवगत आहे.

## रोपवाटिकेची गरज अन् संधी...

रोपवाटिका व्यवसायात योग्य जातींचे बी आणून, त्याची रोपे तयार केली जातात. त्यांची चांगली किंमतही मिळते. मात्र, यासाठी रोप निर्मात्यांची विश्वासार्हता महत्त्वाची असते. ही विश्वासार्हता सातत्यपूर्ण गुणवत्ता मिळवणे आणि टिकवण्यातून येत असते. उत्तम दर्जाचे रोपातून चांगले पीक आणि उत्तम उत्पादन मिळते, हे माहीत असल्याने विश्वासार्हता असलेल्या रोपवाटिकेतून शेतकरी चार पैसे अधिक देऊनही रोपे खरेदी करत असल्याचा अनुभव आहे. अलीकडे फळबागेखालील क्षेत्रात वाढ होत आहे. त्यामुळे नवीन फळझाडांची रोपे बनवणे शक्य आहे. त्याचप्रमाणे फुलझाडांच्या रोपांनाही चांगली मागणी असते. यात घरगुती सुशोभीकरणासाठी आणि व्यावसायिक लागवडीची असे दोन प्रकार पडतात. या दोन्हीमध्ये चांगली संधी आहे. उलट भाजीपाल्याच्या रोपांपेक्षा फळांची आणि फलांची कलमी रोपे अधिक किमतीने विकली जातात. त्यातून अधिक फायदा होतो.महाराष्ट्र आणि अन्य राज्यातूनही फळबाग लागवडीच्या विविध योजना राबवल्या जात असतात. अन्य विविध योजनांमध्येही झाडांचा समावेश असतो.

### रोपवाटिकेचे फायदे

- रोपवाटिकेमध्ये काळजी घेत बसण्याऐवजी दर्जेदार रोपे उपलब्ध होऊ शकतात.
- कलमे किंवा रोपे न करता त्वरित फळबाग लावता येते.
- रोप-कलमे निर्मितीचा वेळ, पैसा व श्रम वाचतात.
- रोपांच्या गुणवत्तेची खात्री घेता येते.
- दुर्मीळ कलमे सहजासहजी उपलब्ध होतात.



# जनावरांचे आगीपासून करा संरक्षण

**आगीची झळ बसलेली जनावरे पूर्णपणे बरी होण्यासाठी प्रदीर्घ कालावधीसाठी औषधोपचार करावा लागतो, जो की पशुपालकाला आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसतो. त्यामुळे आगीपासून जनावरांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना काळजीपूर्वक अंमलात आणाव्यात.**

- गोठ्याची जागा शक्यतो विद्युतवाहक खांब किंवा तारा यांच्यापासून सुरक्षित अंतरावर असावी.
- गोठ्याचे बांधकाम शक्यतो लाकूड, बांबू व शेतातील काड, पालापाचोळा किंवा उसाची पाचट यापासून केलेले नसावे.
- सिमेंट किंवा लोखंडी खांब व पत्र्याचा वापर करून केलेला गोठा आगीमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी उपयुक्त असतो.
- चरायला जाणारी जनावरे गोठ्यात बांधताना साखळदंड व नायलॉन दोरऐवजी सुती दोर वापरून बांधावीत.
- जनावरांवर वेळोवेळी लक्ष देण्याच्या दृष्टीने गोठ्याचे बांधकाम राहत्या घरापासून दूर न करता घराच्या जवळ करावे. जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ उपाययोजना अंमलात आणता येतील.
- गोठा व परिसरात ज्वलनशील पदार्थ ठेऊ नयेत. जनावरे गोठ्यात बांधताना वेसणीऐवजी म्होरकीने बांधल्यास आग किंवा तत्सम अपघातावेळी जनावरांना दोर तोडून गोठ्यातून तत्काळ मुक्त होण्यासाठी सुकर होईल.

## शॉर्ट न्यूज

### डे नाईट क्रिकेट स्पर्धेस नेवाशात प्रारंभ

**नेवासा :** येथील ज्ञान फाउंडेशन व पसायदान स्पोर्ट्स क्लब आयोजित डे नाईट क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक विजय गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. नेवासा तालुक्यातील खेळाडूंसाठी एका नवीन स्पर्धेची संकल्पना ज्ञान फाउंडेशन व पसायदान स्पोर्ट्स क्लबने राबविली असून ही स्पर्धा तालुक्यातील खेळाडूंसाठी पर्वणी ठरणार आहे. तसेच या स्पर्धेतून नवीन खेळाडू तयार व्हावे, या हेतूने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली, असे प्रतिपादन यावेळी विजय गडाख यांनी केले. दिपप्रज्वलन विजय गडाख, नंदकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

### २२ कोटी निधी आणला ही पवार यांची थाप

**जामखेड :** नगर-करमाळा रस्त्यावरील गावांना बायपास झालेला आहे. अशा गावांना माझ्या प्रयत्नातून अंदाजे २२ कोटी निधी आणला, अशी लोणकढी थाप सध्या आ. रोहित पवार मतदारसंघात देत फिरत आहेत. खरचं त्यांनी काम मार्गी लावले असते तर हरकत नव्हती परंतु दुरान्वये ही या कामाशी संबंध नसताना श्रेयवादासाठी कर्जत-जामखेडचे लोकप्रतिनिधी धांदात खोटे बोलत आहेत. जनतेला वस्तुस्थितीचा विपर्यास करून सांगत असल्याची टीका माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक खेडकर यांनी केली.

### विवेक कोल्हेंची यंत्रणा लागली कामाला

**कोपरगाव :** नाशिक विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणूक २६ जून रोजी होत असल्याने इच्छुकांनी जोरदार मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. कोपरगाव येथील संजिवनी एज्युकेशन संस्थेचे ट्रस्टी विवेक बिपीनराव कोल्हे यांनी या निवडणुकीत उडी घेतली असल्याने या विभागातील पाचही जिल्ह्यात त्यांची यंत्रणा कामाला लागली आहे. शिक्षक मतदार संघाचे आमदार किशोर दराडे, टिडीएफचे उमेदवार प्रा. भाऊसाहेब कचरे, नाशिकचे ॲड. संदीप गुळवे, धुळे येथील निशांत रंधे, नगरचे आप्पासाहेब शिंदे, दत्तात्रय पानसरे आदी उमेद्वार आमने-सामने येणार आहे.

### अपघातात वडिलांचा मृत्यू, मुलगा जखमी

**पाथर्डी :** तालुक्यातील आगसखांड फाटा येथील राष्ट्रीय महामार्गावर अपघात होऊन दुचाकीवरील वडिलांचा जागीच मृत्यू झाला, तर मुलगा गंभीर जखमी झाला आहे. कार-दुचाकीमध्ये हा अपघात झाला. रोहिदास माधव वनवे (वय ५२), असे मृत्यू झालेल्या वडिलांचे नाव आहे. मुलगा अविनाश रोहिदास वनवे (वय २४, रा. खडकवाडी, ता. आष्टी, जि. बीड) हा गंभीर जखमी झाल्याने त्याला खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

### पैशाच्या देवाण घेवाणीवरुन महिलेला मारहाण

**राहुरी :** कांता संजय माळी, रा. भिल्लहाटी, राहुरी. यांनी राजु शिंदे याच्याकडुन ५ हजार रुपये ऊसणे घेतले होते. त्या मोबदल्यात त्याला आठवड्याला १ हजार रुपये देत असे. रात्री ८ वाजता कांता माळी या राजु शिंदे याला पैसे देण्याकरीता त्याचे घरी गेल्या. तेथे पैशाच्या देवाणघेवाणी वरुन वाद झाला. आरोपींनी कांता माळी यांना शिवीगाळ करुन कुऱ्हाडीचा दांडा व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. आरोपी राजु रुपचंद शिंदे, विजु रुपचंद शिंदे, विशाल राजु शिंदे, सुनिता राजु शिंदे, सर्व रा. मुलनमाथा, राहुरी. यांच्यावर गुन्हा दाखल केला.

# सुजय विखेंचे मताधिक्य घटणार!

**■ एक लाखांच्या फरकाने विजयी होणार ■ आ.राम शिंदे यांचा विश्वास ■ सर्व्हे जाहीर करणे चुकीचे**

**जामखेड : प्रतिनिधी**



**लोकसभा निवडणुकीबाबतअनेक अफवा पसरत आहेत.आचारसंहिता काळात सर्वेचे अहवाल जाहीर करू नये, असा नियम असतानाही तथाकथित सर्व्हे जाहीर होत आहेत. मात्र,चार जूनला या सर्वांना उत्तरमिळेल. नगर दक्षिणेतून विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे निश्चित विजय होतील. मात्र, मागच्या निवडणुकीत मिळालेले मताधिक्य यावेळी घटणार आहे. सुमारे एक लाखांच्या फरकाने ते विजयी होतील, असा दावा भाजपचे आमदार प्रा. राम शिंदे यांनी केला.**

चौंडी येथे येत्या ३१ मे रोजी आयोजित पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती महोत्सव कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष प्रा. भानुदास बेरड, अरुण मुंडे उपस्थित होते.

प्रा. आ. शिंदे म्हणाले, की निवडणूक काळात वनंतर अनेक अफवा पसरवल्या गेल्या. अनेक तथाकथित सर्व्हेअर निर्माण झाले. आचारसंहितेच्या काळात सर्वेचे अहवाल जाहीर करायचे नसतात, तरीही ते जाहीर होत होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नगरला झालेली सभा,त्या सभेला मिळालेला प्रचंड प्रतिसाद, शिवाय सर्वसामान्यशेतकरी व दुर्लक्षित-उपेक्षितसमाज घटकाला मागील १० वर्षांतमिळालेला न्याय व झालेले सहकार्य, याची जाणीव मतदारांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचे ठरवले असल्याचे सभा व प्रचारातून मला जाणवले. त्यामुळे नगर दक्षिणेतून विद्यमान खासदार विखे निश्चित विजयी होतील.

मागच्या निवडणुकीत खासदार विखे यांना सुमारे पावणे तीन लाखांचे मताधिक्य होते. मात्र, यावेळी ते एक लाखाच्या मताधिक्याने विजयी होतील. कारण २०१४पूर्वीच्या काँग्रेस सरकारच्या काळात काय झाले होते, हे नव्या पिढीला माहीत नाही. त्यामुळे मागच्या १० वर्षांत मोदी सरकारच्या काळाचा ते विचार करतात. त्यामुळे काही अंशीअँटीइन्कंबन्सीचा फटकाम ताधिक्यावर होईल, पण निकालात फरक पडणार नसल्याचा दावा आमदार शिंदे यांनी केला.

दरम्यान, येत्या ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार असून,निकालाबाबत अनेकांच्या पैजा लागल्याचे दिसत आहे.शिक्षक मतदारसंघात महायुतीचा उमेदवार असणार विधान परिषदेच्या नाशिकविभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत नगरजिल्ह्यात महायुतीतून विवेक कोल्हे व राजेंद्र विखे असे दोघे इच्छुक आहेत.महायुतीचे वरिष्ठ नेते उमेदवारीबाबत निर्णय घेतील. मात्र, या मतदारसंघात महायुतीचा उमेदवार असेल,असेही आमदार शिंदे यांनी स्पष्ट केले.

# आरोपींच्या सुटकेसाठी भाजपने कंबर कसली

**■ खुनाला वाचा फुटलीये, घाशीरामांनी लक्षात ठेवावे ■ पुणे अपघातावरून ठाकरे गटाचा आरोप**

**मुंबई : प्रतिनिधी**



**खुनाला वाचा फुटलीये, घाशीरामांनी हे लक्षात ठेवावे. अमितेश कुमारांनी फडणवीसांची चाकरी केली असे म्हणत ठाकरे गटाने पुणे अपघातावरून सत्ताधाऱ्यांसह पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्यावर निशाणा साधला आहे. आमदार धंगेकरांच्या जागरूकतेमुळे 'टिंगे-टिंगरे' टोळी, सरकारचे घाशीराम व पोलीस आयुक्तांचे कारस्थान उधळून लावले आहे असे ते म्हणालेत.**

पुण्यात येताच खुन्यांनाच आधार देण्याचे काम पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश गुप्ता यांची नागपुरातील कारकीर्द ही वादग्रस्त होती. फडणवीस वगैरे लोकांच्या समांतर राज्याचा विनम्र सेवक म्हणूनच त्यांनी चाकरी केली. पुण्यात येताच त्यांनी खुन्यांनाच आधार देण्याचे काम केले. आमदार धंगेकरांच्या जागरूकतेमुळे 'टिंगे-टिंगरे' टोळी, सरकारचे घाशीराम व पोलीस आयुक्तांचे कारस्थान उधळून लावले आहे. दोन खुनांचा विषय या लोकांना सहज मिटवता आला नाही. आपल्या लोकांची प्रकरणे मिटवून टाका हे भाजपचे धोरण पुण्यात चालले नाही. रस्त्यावर दोन खून झाले. खुनाला वाचा फुटली आहे. घाशीरामांनी हे लक्षात ठेवावे!, असे ठाकरे गटाने म्हटले आहे.

पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश गुप्ता यांनी नागपूरचे पोलिस आयुक्त म्हणून 'सेवा' बजावली व नंतर नागपूरकरांनी त्यांना पुण्याची वतनदारी बहाल केली. त्या वतनदारीस जागून श्रीमान गुप्ता हे भाजपास 'दान' देणाऱ्या बिल्डरांना, गुंड टोळ्यांना पाठीशी घालत आहेत. बिल्डर विशाल अग्रवालच्या मद्यधुंद पोराने पुण्यातील कल्याणी नगरात बेदरकारपणे दोन तरुण जिवांचा बळी घेतला. त्या क्षणापासून पुण्याचे पोलिस आयुक्त या प्रकरणी उलटसुलट भूमिका घेऊन लोकांची दिशाभूल करत आहेत, असे म्हणत ठाकरे गटाने अमितेश कुमार याच्यावर आरोप केले आहेत.

'चंदा दो, धंदा लो' हा भाजपचा नवा मंत्र आहेच. अग्रवालने आतापर्यंत कोणाला किती चंदा दिला व त्यामुळे पुण्यातील अनेक टिंगे-व-टिंगरे अग्रवालच्या बचावासाठी कसे निर्लज्जपणे पुढे सरसावले आहेत ते आता दिसत आहे. पुण्यात पोर्शे कारने झालेल्या अपघाताबाबत 'चर्चासत्र' झडत आहेत. अनेक कायदेपंडित, सामाजिक कार्यकर्ते, निवृत्त अधिकारी यावर मंच गाजवीत असले तरी या प्रकरणातील आरोपींच्या सुटकेसाठी भाजपने व पोलिस आयुक्तांनी कंबर कसली आहे. मिंधे सरकारातील काही उद्योगी मंत्र्यांचे पुण्यात बिल्डरी कार्य असून त्यांना अग्रवाल व त्याच्या पोराचा कळवळा आला आहे, असा आरोप ठाकरे गटाने भाजपवर केला आहे.

(पान १ वरून)

### विजयाचा उन्माद नको आणि पराभवाने खचू नका !

जागा निवडून आल्या होत्या. त्यामुळे त्यापेक्षा जास्त जागा आपल्याला लोकसभा निवडणुकीत मागता आल्या नाहीत, असे देखील अजित पवार यांनी स्पष्ट केले. मागील विधानसभा निवडणुकीमध्ये आपण ५७ जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभेत होणार नाही, असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला. आपला कोणताही कार्यकर्ता आणि पदाधिकारी नाराज होणार नाही, अशा सन्मानजनक जागा आपल्याला नक्की मिळतील, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.राज्यसभेवर पाठवण्यासाठी पुढचा खासदार साताऱ्याचाच असेल लोसकभा निवडणुकीतील जागा वाटपात सातारा लोकसभा मतदार संघ देण्याच्या बदल्यात आपल्याला एक राज्यसभेची जागा मिळाली आहे. मात्र, त्यासाठी सातारा जिल्ह्यातूनच राज्यसभेची जागा आपण देणार आहोत. त्या जागेवर सातारा जिल्ह्यातीलच नेत्याला राज्यसभेवर पाठवण्यात येईल, त्यामुळे इतर कोणत्याही जिल्ह्याने त्या जागेवर दावा करू नये, असे देखील अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्याचा प्रयत्न
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्याचा आपला प्रयत्न असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. १० जूनला आपण २६ वा वर्धापन साजरा करत आहोत. या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये अनेकांनी प्रवेश केला आहे. त्या सर्वांचा फायदा आपल्याला होईल, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. १० जूनलाच वर्धापन दिन सर्वांनी चांगल्या पद्धतीने साजरा करा, अशा सूचना देखील अजित पवार यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. मात्र, दिल्लीमधील आपला वर्धापन दिनाचा कार्यक्रम मागे पुढे होऊ शकतो, असे देखील अजित पवार यांनी सांगितले आहे.









# ढोकेश्वर विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.६४ टक्के

■ अपूर्वा झावरे विद्यालयात प्रथम ■ ढोकेश्वर विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम




**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**विद्यालयाने वर्षभर केलेले उत्कृष्ट नियोजन, शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि विद्यार्थी मित्रांनी केलेले कष्ट याशिवाय विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन होणे शक्य नाही असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांनी केले.**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित पारनेर तालुक्यातील श्री ढोकेश्वर माध्य. व उच्च माध्य. विद्यालयाचा इयत्ता दहावी निकाल ९८.६४ % लागला आहे. इयत्ता दहावीला एकूण १४८विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांपैकी ११ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. विशेष योग्यता श्रेणी मध्ये ६६ विद्यार्थी, प्रथम श्रेणी मध्ये ५३ विद्यार्थी, तृतीय श्रेणी मध्ये १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यापैकी ९० % पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार आयोजित करण्यात आला होता त्या प्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी पाटील बोलत होते.

यावेळी पत्रकार शरद झावरे, संतोष कोरडे, शंकर शेळके, डॉ. अरूण झावरे, बाळासाहेब ठाणगे, बापूसाहेब रांधवन, संतोष मंचरे, अनिल ठाणगे, मल्हारी वाघसकर, अनिता म्हस्के, सोमनाथ होराणे, अनुष्का कांबळे उपस्थित होते.
विद्यालयात प्रथम आलेले पाच विद्यार्थी कु. झावरे अपूर्वा शरद ९४.८%, चि. झावरे आदेश अरूण ९३.४ %, कु. रोकडे श्रद्धा अशोक ९३ %, कु. ठाणगे वेदिका अनिल ९२.८ %, चि. सुतार गौरव ज्ञानेश्वर ९२.४%
या सर्व यशस्वी विदयार्थ्यांना प्राचार्य सुनिल वाव्हळ, पर्यवेक्षक शिवाजी सावंत, बाळासाहेब निवडुंगे, राहुल झावरे, अमोल ठाणगे, बाबासाहेब जाधव, रवींद्र मते, सोनल रोहकले, वर्षा भोंडवे इत्यादी शिक्षकांनी वर्षभर मार्गदर्शन केले.

विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे साहेब , सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे. संस्थेचे माजी अध्यक्ष नंदकुमार झावरे पाटील, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी, गव्हर्निंग कौन्सीलचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, प्राचार्य सुनिल वाव्हळ, पर्यवेक्षक शिवाजी सावंत, सर्व शिक्षक, ग्रामस्थ, पालक यांनी या विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

# किसानमध्ये ११ वी पासूनच जेईई,नीट, सीईटीची तयारी

अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांची माहीती   ग्रामीण विद्यार्थ्यांना अल्प फीमध्ये मिळणार सुविधा

**पारनेर : प्रतिनिधी**

**शहरातील किसान इंटरनॅशनल स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये जेईई, सीईटी तसेच नीट या प्रवेश परीक्षांची इयत्ता ११ वी पासूनच तयारी करून घेण्यात येणार असून त्यासाठी अत्यल्प फी आकारण्यात येणार असल्याची माहीती संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी दिली.**




दुष्काळी असलेल्या पारनेर तालुक्यातील बहुतांश कुटूंबांचा चरितार्थ कोरडवाहू शेतीवरच आहे. बुध्दीमंतांची खाण म्हणून ओळख असलेल्या पारनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीनंतर वैद्यकिय, इंजिनिअरींग आदी शाखांमध्ये प्रवेश घेण्याची इच्छा असते. मात्र या अभ्याक्रमांसाठी घेण्यात येणा-या प्रवेश परीक्षेची तयारी करण्यासाठी नगर-पुण्याला जाण्याची आर्थिक कुवत नसल्याने विद्यार्थी बुध्दीमत्ता असूनही या अभ्याक्रमांना प्रवेश घेऊ शकत नाहीत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन किसान इंटरनॅशनल स्कुलमध्ये यंदापासून इयत्ता ११ वी पासून तीनही प्रवेश परीक्षांची तयारी करून घेण्यात येणार आहे.

**१०० टक्के निकालाची परंपरा**

**किसान इंटरनॅशनल स्कुल सुरू झाल्यानंतर १०० टक्के निकालाची परंपरा असून दरवर्षी अनेक विद्यार्थ्यांची डॉक्टर, इंजिनिअरींग या अभ्यासक्रमासाठी शासकीय कॉलेजमध्ये निवड झाली आहे.**

**चंद्रकांत चेडे**
**अध्यक्ष, किसान बहुउददेशिय संस्था, पारनेर**

सीईटी प्रवेश परीक्षेची तयारी करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांकडून ११ हजार रूपये प्रवेश फी घेण्यात येणार असून त्यात ११ वीच्या अभ्याक्रमाच्या फीचाही समावेश असेल. तर जेईई, नीटच प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून २१ हजार रूपये फी आकारण्यात येणार आहे. त्याच फीमध्ये ११ वीच्या अभ्याक्रमाच्या फीचा समावेश असेल.

किसान इंटरनॅशनल स्कुलमध्ये अनुभवी प्राध्यापक वर्ग असून विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त सराव परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. इयत्ता ११ वी पासूनच प्रवेश परीक्षांची तयारी करून घेण्यात येणार असल्याने १२ वीच्या परीक्षेनंतर विद्यार्थी आत्मविश्वासाने प्रवेश परीक्षा देऊ शकतील असा विश्वास चंद्रकांत चेडे यांनी व्यक्त केला.

# बाबुर्डीच्या रोकडेश्वर विद्यालयाचा निकाल १०० टक्के

■ दहावीचा निकाल जाहीर ■ वंदना यादव पहिली



**या आहेत यशस्वी विद्यार्थीनी**

**विद्यालयात प्रथम तीन क्रमांक विद्यार्थीनी पटकाविले असून त्यात वंदना योगेंद्र यादव ८३ टक्के, विद्या अरूण ठुबे ८२.४०, रंजना योगेंद्र यादव ८० टक्के यांचा समावेश आहे.**

**बाबुर्डी : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला असून बाबुर्डी येथील श्री रोकडेश्वर विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. वंदना यादव हिने ८३ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला.**

श्री रोकडेश्वर विद्यालयाची गेल्या दहा वर्षांपासून दहावीच्या परीक्षेच्या १०० टक्के निकालाची परंपरा असून यंदाही ही परंपरा जपत विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.
यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय दिवटे, भाऊसाहेब भोगाडे, गोपीचंद धावडे, स्वप्निल आगरकर, सुभाष भोगाडे, संदीप निचित, जिजाबाई चौधरी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल श्री रोकडेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष ठुबे, उपाध्यक्ष बाळासाहेब गारकर, सरपंच प्रकाश गुंड, उपसरपंच स्वाती जगताप, संस्थेचे सर्व संचालक व ग्रामस्थ यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शिक्षक भाऊसाहेब भोगाडे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये बुध्दीमत्ता असून त्यांना योग्य मार्गदर्शन करून अभ्यासात सातत्य ठेवण्यात विद्यालयाकडून प्राधान्य देण्यात येते. त्यामुळेच गेल्या १० वर्षांपासून दहावीच्या परीक्षेसाठी बसलेले सर्व विद्यार्थी यश संपादन करीत असून पुढील शिक्षणातही ते आघाडीवर असल्याचे दिसून येते. या विद्यालयाचा हा लौकीक असाच कायम ठेउन आपले वेगळेपण जपण्यासाठी विद्यालयातील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रयतनशिल असल्याचे भोगाडे म्हणाले.

# लोणीमावळयात रोहित्र चोर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद!

घटनास्थळी ग्रामस्थ जाताच चोरटयांची धुम



**लोणीमावळा : प्रतिनिधी**

**लोणीमावळा येथील श्री भैरवनाथ पाणी वाटप संस्थेच्या वीज पंपांसाठी बसविण्यात आलेले वीजेच्या रोहित्राची चोरी करताना चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. रोहीत्राची चोरी होत असल्याचे ग्रामस्थांनी लाईव्ह चित्रीकरण पाहिल्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धावा घेतली खरी मात्र ग्रामस्थ आल्याची चाहूल लागताच चोरटे घटनास्थळावरून पसार झाले.**

लोणीमावळा येथील ग्रामस्थांनी श्री भैरवनाथ पाणीवाटप संस्थेची स्थापना करून पारनेर कारखान्याच्या सहकाऱ्याने कुकडी कालव्यातून नळयांद्वारे पाणी उचलून ते तलावात सोडण्यात येते. पाणी उचलण्यासाठी २०० अश्वशक्तीचे तीन वीज पंप बसविण्यात आले असून त्यासाठी वीजेचे स्वतंत्र रोहित्र बसविण्यात आलेले आहे.

आडबाजूला असलेल्या या रोहित्रामधून आजवर अनेकदा वंगन तसेच इतर साहित्याची चोरी झाली असून त्याबाबत तक्रारी करूनही चोरटयांचा शोध लागत नव्हता. त्यावर उपाय म्हणून संस्थेच्या वतीने रोहित्राच्या परीसरावर वॉच ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कॅमेरे बसविण्यात आल्याची चोरटयांना कल्पना नसल्याने रात्रीच्या वेळी रोहित्राजवळ येऊन चोरटयांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला. ते सीसीटीव्हीमध्ये कैद झाले. रोहित्राच्या परीसरात चोरीचा प्रयत्न सुरू असल्याचे सीसीटीव्हीचे फुटेज नागरीकांनी पाहिल्यानंतर संस्थेचे चेअरमन संतोष शेंडकर, भिमाजी लाळगे, बाबाजी शेंडकर, राजेंद्र शेंडकर, कैलास म्हस्के, शरद मावळे, निवृत्ती शेळके यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र ग्रामस्थ येत असल्याची चाहूल लागल्यानंतर चोरटयांनी तिथून पळ काढला.

या घटनेची माहीती देण्यात आल्यानंतर अज्ञात चोरटयांविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस कॉन्स्टेबल कडूसकर तसेच इतर पोलीस कर्मचारी पुढील तपास करीत आहेत. चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने चोरटे जेरबंद होतील असा विश्वास संस्थेचे चेअरमन संतोष शेंडकर यांनी व्यक्त केला.

# यशवंत विद्यालय हिवरे बाजारची २१ वर्षाची परंपरा कायम

विद्यालयाचा दहावीचा निकाल शंभर टक्के



**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**यशवंत माध्यमिक विद्यालय आदर्शगाव हिवरे बाजारच्या इयत्ता दहावीच्या मार्च २०२४ च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून याहीवर्षी यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. कु. रितुजा मंगेश ठाणगे ९३.०० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली, कु.पवार अक्षदा शरद ९२.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात द्वितीय तर चि. गौरव संजय ठाणगे ९१.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात तृतीय क्रमांक मिळवला आहे.**

एकूण ३८ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी २३ विद्यार्थी विशेष गुणवत्ता प्राप्त आहेत व १४ विद्यार्थी प्रथम श्रेणी व १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. यासाठी त्यांना मुख्याध्यापक मुरलीधर अमृते तसेच शिक्षक दिपक ठाणगे, कैलास खैरे, नंदकुमार झावरे व नीता सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.
सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पदमश्री डॉ.पोपटराव पवार कार्याध्यक्ष आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समिती महाराष्ट्र राज्य, सौ.विमलताई ठाणगे सरपंच आदर्शगाव हिवरेबाजार , छबुराव ठाणगे चेअरमन, रामभाऊ चत्तर व्हा. चेअरमन, हरिभाऊ ठाणगे सर, एस.टी.पादीर (अध्यक्ष) शाळा व्यवस्थापन समिती, बाबासाहेब गुंजाळ चेअरमन दूध डेअरी, रोहिदास पादिर, सहदेव पवार गुरुजी,दत्तात्रय ठाणगे सर व सर्व पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# वृक्षप्रेमी रसाळ दाम्पत्याचे यांचे कार्य कौतुकास्पद

माजी उपसभापती बबुशा वरखडे यांचे गौरोद्गार



**निघोज : प्रतिनिधी**

**वृक्षप्रेमी पोपटराव रसाळ व ग्रामपंचायत माजी सदस्या पुजाताई रसाळ यांनी गेली दहा वर्षात औरंगाबाद व नगर जिल्ह्यातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षाची लागवड करून मोठे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन बाजार समितीचे माजी उपसभापती बबुशा वरखडे यांनी व्यक्त केले.**

रविवार दि. २६ रोजी निघोज व परिसरातील झाडे लावा झाडे जगवा या धर्तीवर काम करीत असलेले रसाळ बंधू यांनी झाडांना पाणी घालण्यासाठी व झाडांची निगा राहण्यासाठी नवीन ट्रॅक्टर घेऊन त्याचे लोकार्पण माजी सरपंच ठकाराम लंके , निघोज सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ व उपसरपंच माऊली वरखडे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी वरखडे बोलत होते.

यावेळी वृक्षप्रेमी पोपटराव रसाळ, त्यांचे बंधू व निघोज परिसरातील हजारो वृक्षांचे नियोजन करणारे दत्तात्रय रसाळ, ग्रामपंचायत माजी सदस्या पुजाताई रसाळ, ग्रामपंचायत माजी सदस्य दिलीप ढवण, मळगंगा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विठ्ठलराव कवाद, संदीप वराळ, प्रगतीशील शेतकरी हौशाभाऊ शेटे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
माजी उपसभापती वरखडे यावेळी म्हणाले गेली दहा वर्षांपासून रसाळ बंधू औरंगाबाद जिल्ह्यातील अनेक गावात वृक्षबँक माध्यमातून वृक्ष लागवड करीत आहेत तेच अनुकरण त्यांनी निघोज परिसरात करुन जवळपास पाच हजार वृक्षांचे संगोपन करीत जनतेला झाडे लावा व जगवा हा संदेश देत मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. एवढी मोठी यंत्रणा उभी करूण ते लोकसहभागातून हे काम करीत आहेत. औरंगाबाद येथे वृक्षबँकेसाठी पुढाकार घेऊन लाखो झाडांचे संगोपन त्यांनी केले आहे. सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ तसेच उपसरपंच माऊली वरखडे यांनीही रसाळ बंधूंचे कौतुक केले.

यावेळी वृक्षप्रेमी पोपटराव रसाळ यांनी वृक्षबँक तसेच वृक्षारोपण याची माहिती दिली. यावेळी संतोष रसाळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी दत्तात्रय रसाळ यांनी आभार मानले.

# २५ वर्षानंतर भेटले दहावीचे विद्यार्थी !

सेनापती बापट विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर शहरातील सेनापती बापट विद्यालयाच्या सन १९९९ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांचे २५ वर्षानंतर गेट टुगेदर आयोजित करण्यात आले होते. तब्बल २५ वर्षानंतर एकमेकांना भेटलेल्या वर्ग मित्र मैत्रीणींनी एकमेकांची आस्थेने विचारपुस केली.**

मा. प्राचार्य आर.डी.गांधी, प्राचार्य संतोष कुलकर्णी, सुनील गायकवाड, रावसाहेब कासार या शिक्षकांसह बॅचचे सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी यावेळी उपस्थित होते.
व्हाटस्ॲप या सोशल मीडियाच्या माध्यमातून हे सर्व विद्यार्थी एकत्र आले. माजी विद्यार्थी प्रदीप बोरूडे, संतोष पानसरे, गणेश मगर, डॉ. बाळासाहेब कावरे, विद्या सोनवणे, योगिता माळशिकारे, सतीश म्हस्के, मयुर नरोडे, मनिषा दरेकर, धनंजय क्षिरसागर, विवेक लोखंडे, अभिजित सातपुते यांनी पुढाकार घेत स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते.

एकमेकांना भेटल्यानंतर विद्यार्थी व विद्यार्थीनी जुन्या आठवणीमध्ये रमून गेले.२५ वर्षांच्या कालखंडानंतर कुणी नोकरी तर कुणी व्यवसायात स्थिरावले आहेत. विद्यार्थीनी प्रामुख्याने संसारामध्ये रमल्या आहेत. २५ वर्षापूर्वीचा कालखंड व सध्याच्या कालखंडामध्ये झालेला प्रचंड बदल, सोशल मीडियाचा प्रभाव व पाश्चात संस्कृतीचा वाढत चाललेला बडगा यावरही विद्यार्थ्यांमध्ये विचारांचे आदान प्रदान झाले.

**विद्यार्थी, विद्यार्थीनी गायले आणि नाचलेही !**

**शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देताना माजी विद्यार्थी विद्यार्थी गायले आणि नाचलेही ! पंचवीस वर्षानंतर पार पडलेल्या या स्नेहमेळाव्याचा मनमुराद आनंद घेत सायंकाळी सर्वांनी एकमेकांचा निरोप घेत पुन्हा भेटण्याचा शब्दही दिला.**

शाळकरी विद्यार्थ्यांप्रमाणेच एकत्र आलेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनींनी यावेळी गेल्या २५ वर्षाच्या जीवनातील चढ उतरांचा आपल्या भाषणात आढावा घेतला. आजच्या पेक्षा शालेय जीवन फार सुंदर होते अशा भावनाही व्यक्त केल्या गेल्या. शिक्षकांनी मार्गदर्शन करताना आता तुमच्या पाल्यांचे करीअर घडविण्यासाठी काय काळजी घ्याल याचा बहुमाल सल्लाही त्यांनी दिला.

# वृक्षचषक व्हॉलीबॉल स्पर्धेत निघोजचा संघ सर्वप्रथम

वृक्षसंगोपनानंतर मिळणार बक्षिस

**निघोज : प्रतिनिधी**



**निघोज येथील वृक्षप्रेमी कार्यकर्ते व व्हॉलीबॉल प्रेमी युवकांनी वृक्षचषक व्हॉलीबॉल स्पर्धे चे आयोजन केले होते यावेळी सर्व प्रथम निघोज, द्वितीय क्रमांक शिक्रापूर, तृतीय क्रमांक ढवळपुरी, चतुर्थ क्रमांक कोरेगाव भिमा येथील संघांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करीत वृक्षचषक पटकावला. विजेत्या संघाना वृक्ष देण्यात आला मात्र या संघांनी या वृक्षाचे संगोपन करायचे व पुढील वर्षी स्पर्धा संयोजकांना तो फोटो दाखविल्यानंतर विजेत्या संघाना बक्षीस दिले जाणार आहे.**

याबाबतची अधिक माहिती देताना पारनेर तालुका व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष रावसाहेब वराळ यांनी सांगितले की यावर्षीच्या तापमानात उच्चांकी वाढ झाली आहे झाडे लावा झाडे जगवा हा संदेश या निमित्ताने निघोज येथील वृक्षप्रेमी पोपटराव रसाळ निघोज आणि परिसराला प्रत्यक्ष कृतीतून देत आहेत. निघोज व परिसरातील निघोज - वडनेर रस्ता तसेच निघोज - कुंड रस्ता तसेच स्मशानभूमी परिसरात गेली पाच वर्षात हजारो झाडे लावून त्यांनी वृक्षसंगोपन मोठ्या प्रमाणात केले आहे. यावर्षी तापमानाने कहर केला आहे.

कुकडी डावा कालव्याचे पाणी निघोज व परिसरातील शेतीला उपलब्ध असून हिरवागार परिसर असूनही तापमानाची तिव्रता या भागात मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. यासाठी रसाळ व त्यांच्या सहकाऱ्यांकडून प्रेरणा घेऊन आम्ही पारनेर तालुका व्हॉलीबॉल असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य यांनी व्हॉलीबॉल स्पर्धे चे आयोजन करीत वृक्षचषक भरवण्याचा निर्णय घेऊन व्हॉलीबॉल प्रेमी जनता व खेळाडू वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे हा संदेश देण्याचा छोटा प्रयत्न केला असून या स्पर्धेत निघोज, शिक्रापूर, ढवळपुरी, कोरेगाव भिमा, जवळा,टाकळी हाजी,आमदाबाद आदी पारनेर व शिरूर तालुक्यातील संघानी भाग घेऊन स्पर्धेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे.

यावेळी शेकडो व्हॉलीबॉल प्रेमी जनतेने या स्पर्धेचा आनंद घेतला यावेळी वृक्षप्रेमी पोपटराव रसाळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच संभाजीनगर वृक्षबँक शाखा निघोज व वृक्षप्रेमी पोपटराव रसाळ मित्र मंडळ यांच्या वतीने वृक्ष देण्यात आले. यावेळी पारनेर तालुका व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष रावसाहेब वराळ,शिरूर तालुका व्हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष सोमनाथ तात्या सायकर, निघोज व्हॉलीबॉल ग्रुप सदस्य संदीप रामदास लंके, सुधीर वाखारे, प्रदिप लंके, मंगेश लंके, लहू निचीत,शुभम गरूड, प्रविण श्रीमंदीलकर, सोमनाथ भोसले , कुमार भोसले,अक्षय अनंत, सुरज खोसे, तन्मय लामखडे, कैलास भंडारी, संदीप बबनराव लंके, योगेश लंके, रोहित वराळ, ऋषी ठुबे, विनायक कवाद, सुनिल गायखे, अभि शेटे, ओंकार भुकन, साहिल पवार आदी तसेच व्हॉलीबॉल प्रेमी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com